झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र
पुणे - १६
दिनांक :- १०।२।२००९

कार्यालयीन परिपत्रक क्र. - १९

विषय :- झोपडपट्टी पुनवर्सन योजना
देखभाल खर्च रु.२०,०००/- प्रती सदनिका या नापरतावा अनामत ठेव रकमेच्या वापराचे नियोजन.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टीपीएस - १८०८/ प्र.क्र.-१२४२/०८/नवि-१३, दि. ११/१२/२००८ या अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश देऊन पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्राच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी विशेष नियमावली तात्काळ लागू केलेली आहे.तसेच कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करण्याचे निदेश दिलेले आहेत.

सदर विशेष नियमावलीतील नियम क्र.एस.आर १ (८) (IV) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटकाच्या इमारतीमधील समाजमंदीर व बालवाडी यासह प्रत्येक सदनिकेसाठी तसेच कायम संक्रमण शिबीराच्या इमारतीमध्ये प्रत्येक सदनिकेसाठी रु.२०,०००/- किंवा राज्यशासन वेळोवेळी ठरवून देईल ती रक्कम विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत.देखभाल खर्च नापरतावा ठेवीची रक्कम विकसकाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा यांनी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार दोन हप्त्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत.संबंधीत योजनेतील मूळ पात्र झोपडपट्टीवासीयांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्यावर त्या संस्थेमार्फत,उपरोक्त प्राप्त झालेल्या रकमेवरील व्याजातून सर्व पुनर्वसन सदनिकांच्या देखभालीच्या खर्चाचा बोजा भागविण्याचे अभिप्रेत आहे.या रकमेवर कमीत कमी १० वर्षे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधीकरणाचे नियंत्रण राहून त्यावरील प्राप्त होणा-या व्याजाचा विनियोग झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत स्थलांतरित झालेल्या झोपडपट्टी वासियांच्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेस करता यावा या हेतूने खालील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

१. विकसकाने देखभाल खर्चासाठी प्रती सदनिका रु.२०,०००/- प्रमाणे जमा केलेली रक्कम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये ठेवण्यात यावी.

२.झोपडपट्टीवासीयांची सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर व झोपडीधारक पुनर्वसन योजनेत प्रत्यक्ष स्थलांतरित झाल्यानंतर संस्थेच्या पदाधिकारी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विहीत नमून्यातठेवीच्या रकमेची मागणी करावी.

३. सहकारी गृहनमांण संस्थेने मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र, सदस्यांची अधिकृत यादी व ठेवीच्या रकमेच्या मागणीबाबतचा ठराव इ. कागदपत्रे सादर करावीत.

४. विकसकाकडून जमा करण्यात आलेल्या देखभाल ठेवीच्या रकमेची प्रति सदनिका रू. २०,०००/- प्रमाणे अधिकृत यादीतील सदस्य संख्येच्या प्रमाणात, राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेत १० वर्ष इतक्या कालावधीची मुदतठेव पावती (टर्म डिपॉझिटची पावती) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या संयुक्त नावे घेण्यात यावी. सदरची मुदत ठेव पावती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडेच लेखा विभागात ठेवण्यात यावी.

५. मुदतठेव पावती घेताना बँकेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून खालील सूचना द्याव्यात-

अ) जमा रकमेवर अर्जीत झालेले तीमाहीचे व्याज नियमीतपणे बँकेकडून संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या खात्यावर धनादेशाव्दारे जमा करण्यात यावे.

ब)इतर रक्कम ज्याप्रमाणे काढली जाते त्याप्रमाणेच या व्याजाची उचल करण्याचे अधिकार संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस राहतील.

क) संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने मागणी केल्यावर बँकेने सहकारी संस्थेस नियमितपणे हिशोब द्यावेत.

ड) १० वर्षाच्या कालावधीनंतर सदर मुदतठेव पावतीची रक्कम सहकारी संस्थेच्या नावे जमा करावी. त्याकरिता सहकारी संस्थेने प्राधिकरणाकडे अर्ज केल्यानंतर मुदतठेव पावती सहकारी संस्थेस हस्तांतरीत करण्यात येईल.

६. सहकारी संस्थेने त्यांचेकडे प्राप्त होणा-या वीज बिले, पिण्याच्या पाण्याची बिले,विद्युत पंप तसेच लिफ्ट दुरूस्ती व देखभाल खर्चाची बिले इ. चा खर्च भागविण्यासाठी या व्याजाच्या रकमेचा वापर करावा.

७. मुदत ठेव पावतीचा १० वर्षाचा कालावधी संपल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या संयुक्त नावावर असलेली पावती वटविल्यावर प्राप्त होणा-या रकमेचा व वापराचा सर्व हक्क त्या सहकारी संस्थेचा राहील.

प्रस्तुतचे निर्देश तात्काळ अंमलात येतील.

(प्रवीणसिंह परदेशी)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र.

d/sandy/12lp2

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६३०२३४ फॅक्स : ०२०-२५६३०२३५
ई-मेल : srapune@yahoo.in

क्रमांक :-झोपुप्रा/अप्रक/प्र.क्र-१९/प्रशा-१/२०१० दिनांक -२७/०६/२०१०

आदेश

विषय : झोपडीधारकांची पात्रता यादी (परिशिष्ठ-२) व संमतीपत्र पडताळणी करण्याबाबतचे अधिकार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांना प्रदान करणेबाबत.

२. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झोपुप्रा-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३० जून २००५ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ अ मधील तरतुदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

३. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २ (१९) (बी) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे घोषित झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण आहे.

४. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील कार्यालयीन आदेश क्र. नियुक्ती-२०१०/प्र.क्र.१९३/प्रशा-३, दि.१०/०६/२०१० अन्वये उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी यांची सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

५. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची शिघ्र गतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३-एक्स, ३-वाय व ३-झेड मधील तरतुदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करुन झोपडीधारकांची पात्रता यादी (परिशिष्ठ-२) तयार करणे, झोपडीधारकांच्या संमतीपत्राची पडताळणी करणे व तदनुषंगिक कार्यवाही करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांना असलेले अधिकार उक्त

अधिनियमाच्या कलम ३-एस मधील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

६. सदर आदेश तात्काळ अंमलात येत आहेत.

(महेश झगडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,

प्रत-

१. मा.सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
२. मा. प्रधान सचिव, नगर विकास , नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
३. मा.आयुक्त , पुणे महानगरपालिका,पुणे ४११ ००५.
४. मा.आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी , पुणे ४११ ०१६.
५. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ,पुणे.
६. निवड नस्ती.

३१/५
(५७)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
पुणे - ४११ ०१६.
दिनांक -२२/६/२००९.

कार्यालयीन आदेश क्र. 537

विषय :- कार्यालयीन कार्यपध्दतीनुसार नोंदवह्या/अभिलेख ठेवण्याची जबाबदारी निश्चित करणेबाबत.

१. महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झोपुयो-२००४/ प्र.क्र-२१३ / झोपडपट्टी-१, दि.३०/६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.कार्यालयीन कार्यपध्दतीनुसार या कार्यालयाच्या कामाच्या अनुषंगाने कोणत्या नोंदवह्या व अभिलेख ठेवणे आवश्यक आहे त्याबाबतचे निर्देश कार्यालयीन आदेश क्र.२० दि.१०.२.२००९ अन्वये निर्गमीत करण्यात आले आहेत. तथापी सदर नोंदवह्या/अभिलेख कोणी वा कोणत्या स्तरावर अद्ययावत करावेत/ठेवावेत तसेच कोणत्या स्तरावर पडताळणी करून प्रमाणित करावेत याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक होते.

२. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.२० दि.१०.२.२००९ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यालयीन आदेश निर्गमीत करण्यात येत आहेत.

अ.क्र.	नोंदवही/अभिलेख	नोंद करणा-याचे पदनाम व नाव	प्रमाणित करणारे अधिकारी.
१.	स्थायी आदेश संचिका	आवक लिपीक १.श्री.पुराणिक २.श्रीमती कुलकर्णी सहायक १. श्री.स.ब.जगताप	उपमुख्य का.अधिकारी.
२.	मध्यवर्ती आवक-जावक नोंदवही.	आवक/जावक लिपीक १.श्री.पुराणिक २.श्रीमती कुलकर्णी	----------

३.	शासन संदर्भाची नोंदवही.	सहायक १.श्री.अनिल काटकर	उपमुख्य का.अधिकारी.
४.	न्यायालयीन प्रकरणांची नोंदवही.	संबंधीत कनिष्ठ अभियंता सहायक श्री.सं.ब.जगताप	उपमुख्य व अतिरिक्त मुख्य का.अधिकारी.
५.	माहितीचा अधिकार अधिनियमानुसार प्राप्त अर्जाची नोंदवही.	संबंधीत कनिष्ठ अभियंता	सहाय्यक अभियंता व उप मुख्य का.अधिकारी.
६.	माहितीचा अधिकार अधिनियमानुसार दाखल अपिलाची नोंदवही.	संबंधीत कनिष्ठ अभियंता	सहाय्यक अभियंता, उप मुख्य व अतिरिक्त मुख्य का. अधिकारी.
७.	लोकशाही दिन संदर्भाची नोंदवही.	संबंधीत कनिष्ठ अभियंता सहाय्यक श्री.अनिल काटकर	सहाय्यक अभियंता उपमुख्य कार्य. अधिकारी
८.	संसद व विधीमंडळ प्रश्नांची नोंदवही.	संबंधित क.अ कनिष्ठ अभियंता सहाय्यक श्री.अनिल काटकर	सहाय्यक अभियंता उपमुख्य कार्य. अधिकारी मुख्य कार्य. अधिकारी.
९.	संसद व विधीमंडळ सदस्य यांच्या संदर्भाची नोंदवही.	संबंधित कनिष्ठ अभियंता सहाय्यक श्री.अनिल काटकर	सहाय्यक अभियंता उपमुख्य कार्य. अधिकारी मुख्य कार्य. अधिकारी.
१०.	अर्धशासकीय पत्रांची नोंदवही.	आवक लिपिक १.श्री.पुराणिक २.श्रीमती कुलकर्णी	उपमुख्य व अतिरिक्त मुख्य कार्य. अधिकारी.

११.	झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची नोंदवही.	संबंधित कनिष्ठ अभियंता सहाय्यक श्री.सं.ब.जगताप	सहाय्यक अभियंता उपमुख्य कार्य. अधिकारी मुख्य कार्य. अधिकारी.
१२.	झो.पु.प्रा ने मान्यता दिलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची नोंदवही.	संबंधित कनिष्ठ अभियंता सहाय्यक श्री.सं. ब.जगताप	सहाय्यक अभियंता उपमुख्य कार्य. अधिकारी मुख्य कार्य. अधिकारी.
१३.	झोपडपट्टी पुनर्वसन योजना बांधकाम परवानगीची नोंदवही.	संबंधित कनिष्ठ अभियंता	सहाय्यक अभियंता सहायक संचालक न.र. उपमुख्य व अतिरिक्त मुख्य कार्य. अधिकारी.
१४.	हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) बाबत परवानगीची नोंदवही.	संबंधित कनिष्ठ अभियंता	सहाय्यक अभियंता, सहायक संचालक न.र. उपमुख्य व अतिरिक्त मुख्य कार्य. अधिकारी.
१५.	पात्र झोपडपट्टी धारकांना वितरीत केलेल्या सदनिकांची नोंदवही.	संबंधित कनिष्ठ अभियंता सहायक श्री.सं.ब.जगताप	सहाय्यक अभियंता, उपमुख्य व अतिरिक्त मुख्य कार्य. अधिकारी.
१६.	विकसक नोंदणीबाबतची नोंदवही.	सहाय्यक श्री.अनिल काटकर	उपमुख्य कार्य. अधिकारी.
१७.	वसूलीची नोंदवही	संबंधित कनिष्ठ अभियंता लेखाधिकारी श्री.काथे	सहाय्यक अभियंता, सहायक संचालक न.र. उपमुख्य व अतिरिक्त मुख्य कार्य. अधिकारी.

३. वर नमूद केल्याप्रमाणे त्या त्या स्तरावर नोंदवह्या/अभिलेख अद्ययावत करावेत व नोंदी ठेवावेत तसेच स्तंभ ४ मध्ये दर्शविल्याप्रमाने त्या स्तरावर पडताळणी करून प्रमाणित करावेत वरील आदेश तात्काळ लागू करण्यात येत आहेत.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र.

प्रत,

कार्यालयीन निवड नस्ती.